Jagdamba Education Society's

Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by

NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

Date: 13/06/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष



## ख्यातकीर्त शिल्पकार विनायक करमरकर

विनायक पांडुरंग करमरकर हे वास्तववादी शैलीत दर्जेदार स्मारकशिल्पे घडविणारे आधुनिक काळातील एक ख्यातकीर्त महाराष्ट्रीय शिल्पकार होते. नानासाहेब या नावाने ते अधिक परिचित होते. त्यांचा जन्म २ ऑक्टोबर १८९१ रोजी अलिबागजवळील सासवणे (तत्कालीन जि. कुलाबा, सांप्रत जि. रायगड) येथे झाला. गणपतीच्या मूर्ती घडविणे हा त्यांच्या कुटुंबाचा परंपरागत व्यवसाय होता. साहजिकच बालवयातच त्यांना कलेची आवड निर्माण झाली. तसेच चित्रकलेतदेखील त्यांना गती होती. ते देवळातील भिंतींवर चित्रे काढत असत. ही चित्रे तत्कालीन कुलाबा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी ओटो रॉथफिल्ड यांच्या दृष्टीस पडली. त्यांनी करमरकरांना सर. जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई येथे कलेचे शिक्षण घेण्यास आर्थिक मदत देऊन प्रवृत्त केले (१९१०). त्यांनी जी. डी. आर्ट ही पदविका घेतली (१९१३).

जे. जे. मध्ये त्यांना उत्तम शिल्पकृतीबद्दल लॉर्ड मेयो पदक मिळाले. याच काळात त्यांची ओळख सर्जन डॉ. भाजेकर आणि रवींद्रनाथ टागोरांचे नातू सुरेंद्रनाथ यांच्याशी झाली. त्यांच्या आग्रहाखातर ते कोलकात्याला गेले. तेथे त्यांनी झांवबझार येथे स्वत:चे कलामंदिर (स्टुडिओ) उभारले. याच सुमारास त्यांनी पूर्वाश्रमीच्या येसू परांजपे या युवतीशी लग्न केले (१९१८). करमरकरांनी बेलूर मठातील रामकृष्ण परमहंसांचा पुतळा बनविला (१९१६-२०). त्यामुळे त्यांना बरीच कामे मिळू लागली. त्यांनी शास्त्रज्ञ पी. सी. रे, देशबंधू चित्तरंजनदास यांची व्यक्तिशिल्पे केली. महात्मा गांधीजींना समोर बसवून त्यांचे शिल्प केले. अखिल भारतीय शिवस्मारक समितीचे अध्यक्ष कोल्हापूरचे छत्रपती राजाराम महाराज यांनी करमरकरांना पुणे येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याचे काम दिले. १३ जून १९६७ रोजी विनायक करमरकर यांचे निधन झाले.

Nashik Edition

Jun 13, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

Jagdamba Education Society's

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

सकाळ

# शिक्षण घेतानाच २२८ विद्यार्थ्यांना नोकरी

## बाभूळगावच्या एसएनडी पॉलिटेक्निकमध्ये प्लेसमेंटमधून नामांकित कंपन्यांमध्ये निवड

■ **सकाळ वृत्तसेवा**

येवला, ता. ९ : शिक्षण घेताना शेवटच्या वर्षातच नोकरी लागली तर होणारा आनंद गगनापार असतो. बाभूळगाव येथील जगदंबा एज्युकेशन संस्थेच्या एसएनडी पॉलिटेक्निकमध्ये वर्षभरात तब्बल २२८ विद्यार्थ्यांना शिकत असतानाच नोकरीची संधी मिळाली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये एसएनडी पॉलिटेक्निक येथे आयोजित पूल कॅम्पसमध्ये या विद्यार्थ्यांची विवीध नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. संस्थेने आणखी एक यशाचे शिखर गाठले आहे. विद्यार्थांना औद्योगिक क्षेत्राची माहिती व्हावी यासाठी तज्ज्ञांचे व्याख्यान व विविध कंपन्यांना भेटी देऊन तेथे होत असलेल्या कामाची रूपरेषा कशी असते याविषयी मार्गदर्शन आयोजित केले जाते. पुणे येथील टाटा मोटर्स मध्ये ५० विद्यार्थ्यांची निवड झाली. नाशिक येथील बॉश कंपनीमध्ये मेकॅनिकल अभियांत्रिकीचे १७ विद्यार्थी तर इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीचे १८, मुंबई येथील भारत गिअर कंपनीमध्ये मेकॅनिकलच्या ३५ विद्यार्थांची, अहिल्यानगर येथील माय इंडिया कंपनीत मेकॅनिकलचे १८ विद्यार्थी तर इलेक्ट्रिकलचे २२ विद्यार्थ्यांची निवड झाली. संभाजीनगर येथील बजाज ऑटो कंपनीमध्ये मेकॅनिकलच्या २८ विद्यार्थी तर इलेक्ट्रिकलच्या २५ विध्यार्थांची निवड झाली. नाशिक येथील स्कायवे ग्रुपमध्ये सिव्हील इंजिनिअरिंगच्या १५ विद्यार्थ्यांची निवड झाली. विविध कंपन्यांमध्ये निवड झालेल्या विध्यार्थांना प्रतिवर्ष सरासरी ३-४ लाख रुपये पगार व कंपनीच्या विविध सुविधा मिळणार असल्याची माहिती प्राचार्य उत्तम जाधव यांनी दिली. संस्थेचे कार्यकारी संचालक रुपेश दराडे, प्राचार्य जाधव यांच्यासह विभागप्रमुख संदीप असुदे, गणेश चव्हाण, शोराब शेख, रविकुमार ताकसांडे, विजय गंडोळे, प्रवीण लहरे, संतोष माकुने आदींनी विध्यार्थांचे अभिनंदन केले.



**बाभूळगाव** : कॅम्पस प्लेसमेंटमधून नोकरीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांसोबत महाविद्यालयाचे प्राध्यापक.

> एसएनडी कॅम्पसमध्ये उपलब्ध अत्याधुनिक सुविधेमुळे तसेच विद्यार्थ्यांना शिकत असतानाच कॅम्पस मुलाखती व कंपन्यांसंदर्भात ज्ञान व माहिती देण्याचा प्रयत्न होतो. त्याचे फलित म्हणजे अधिकाधिक विद्यार्थ्यांना शिकत असतानाच नोकरी मिळत आहे याचा संस्थेला अभिमान वाटतो.
> - **रूपेश दराडे**, संचालक, मातोश्री शिक्षण संस्था, येवला.

Nashik, District-Today
10/06/2025 Page No. 3